# :: प्रेस नोट ::

## आरोपी विजय मुरारी देशमुख, पद—सहाय्यक आरेखक, वर्ग—३, कार्यालय कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, भंडारा यांना कारावासाची शिक्षा

तक्रारदार यांना तुमसर जवळील खरबी जिल्हा भंडारा येथे नवीन राईसमिल बनविण्याकरीता लागणारे अकृषीक जमीनीचे नाहरकत प्रमाणपत्र देण्याकरीता आरोपी लोकसेवक विजय मुरारी देशमुख, पद—सहाय्यक आरेखक, वर्ग—३, कार्यालय कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, भंडारा यांनी तक्रारदार यांना २,५००/—रू लाचेची मागणी करून स्विकारल्याने त्यांचे विरूध्द पोलीस स्टेशन भंडारा येथे अप. क्र. ३०५७/१४ कलम ७,१३ (१) (ड), १३ (२) ला.प्र. कायदा १९८८ अन्वये दि. २४/०३/२०१४ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला. सदर गुन्हयाचा तपास पुर्ण करून मा. न्यायालयात दोषारोप पत्र सादर करण्यात आले.

मा. श्री सचीन बी. भंन्साली, अतिरिक्त सत्र न्यायाधिश, विशेष न्यायालय, भंडारा यांचे न्यायालयात सदर खटला चालविण्यात आला. दि. ०६/०५/२०१९ रोजी मा. न्यायालयाने आरोपी विजय मुरारी देशमुख, पद—सहाय्यक आरेखक, वर्ग—३, कार्यालय कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, भंडारा यांना कलम ७ लाप्रका मध्ये ३ वर्षे कारावास व ३,०००/— रुपये दंड, दंड न भरल्यास ३ महिने शिक्षा व कलम १३, (१) (ड), सह कलम १३ (२) लाप्रका. अन्वये ३ वर्षे कारावास व ३०००/— रुपये दंड, दंड न भरल्यास ३ महिने साधा कारावासाची शिक्षा सुनावली आहे.

सदर गुन्ह्याचा तपास तत्कालिन पोलीस उप अधीक्षक, प्रशांत कोलवाडकर , लाप्रवि भंडारा यांनी पुर्ण करुन न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. सरकारी पक्षाचे वतीने जिल्हा शासकीय अभियोक्ता श्री विश्वास तवले यांनी काम पाहिले व त्यांना श्री महेश चाटे, पोलीस उपअधीक्षक श्री योगेश्वर पारधी, पोलीस निरीक्षक, पो.हवा. रविंद्र गभने, पो. शि. संदिप पडोळे, लाप्रवि. भंडारा यांनी सहाय्य केले.

श्री श्रीकांत धिवरे पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो नागपूर परिक्षेत्र तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा यांचे वतीने कोणी खाजगी ईसम लाचेची मागणी करीत असल्यास कृपया ॲन्टी करप्शन ब्युरो, कार्यालयाशी संपर्क साधावा.


SP ACB Nagpur- 7040222221
Landline no. - 0712/ 2561520
Toll Free No. 1064
Website:- www.acbmaharashtra.gov.in
Mobile App:- www.acbmaharashtra.net
Facebook Page:- www.facebook.com/MaharashtraACB
Whatapp No- 9930997700


D.C.P./S.P. Anti Corruption Bureau ★Nagpur★

(विजय माहुलकर)
पोलीस उप अधीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो, नागपूर